**महाराष्ट्र शासन**
**ग्रंथालय संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई-४०० ००१**

**शासकीय ग्रंथालयांसाठी सन २०२४-२५ करीता ई-बुक्स (e-books) खरेदीचे सूटदर निश्चितीसाठी दरपत्रक/ निविदा मागविणे**

ग्रंथालय संचालनालय व संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील शासकीय ग्रंथालयांसाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील **ई-बुक्स** (e-books) खरेदी निधीच्या उपलब्धतेनुसार करावयाची आहे. त्याकरिता खालील नमून्यात ई-बुक्स सूटदर सादर करण्यात यावेत.

| अ.क्र. | ई - बुक्स संख्या | भाषा | | |
|---|---|---|---|---|
| | | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| १. | ० ते १०० | | | |
| २. | १०१ ते ५०० | | | |
| ३. | ५०१ ते १००० | | | |
| ४. | १००१ ते २००० | | | |
| ५. | २००१ ते ५००० | | | |
| ६. | ५००१ ते १०००० | | | |
| ७. | १०००० पेक्षा जास्त | | | |

सदर संबंधित ई-बुक्स (e-books) विक्रेत्यांकडून, वितरकांकडून, प्रकाशनसंस्था कडून ग्रंथालय संचालनालय व संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील शासकीय ग्रंथालयांकरिता ई-बुक्स ॲक्सेस/पुरवठासाठी किती सूटदर देऊ शकतील, याबाबतचे दरपत्रक/निविदा मागविण्यात येत आहे.

**ई-बुक्स (e-books) सूटदरकरीता दरपत्रक/ निविदासोबत खालील पुरावे साक्षांकित छायाप्रतीसह जोडण्यात यावेत.**

१. पुरवठा करण्यात येणारे ई-बुक्सची विषयनिहाय यादी, प्रकाशन वर्ष व किंमतीसह जोडणे आवश्यक राहील.
२. पुरवठादारांनी दिलेल्या यादीतील सर्व ई-बुक्स घेण्यात येणार नसून ई-बुक्स निवडीचे अधिकार ग्रंथालय संचालनालय व संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय ग्रंथालयांना राहतील.
३. ई बुक्सची गोपनीयता (secrecy) ठेवणे बंधनकारक राहील.
४. ई-बुक्सचा Access Remote, Laptop, Desktops and Mobile ला किमान ५ वर्षासाठी असणे आवश्यक आहे.
५. राष्ट्रीय / राज्यस्तरीय ई-बुक्स विक्रेत्या संघटनेशी सभासद नोंदणी आवश्यक आहे.
६. PAN/TAN Card प्रत जोडणे आवश्यक आहे.
७. मागील ३ वर्षाचे आयकर भरलेले प्रमाणपत्र प्रमाणित केलेले जोडणे आवश्यक राहील.
८. सदर ई-बुक्स सूटदरामध्ये देखभाल दुरुस्ती खर्चासह समावेश असावा.
९. शॉप ॲक्ट लायसन्स किंवा कंपनी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत जोडण्यात यावी.
१०. शासकीय/निमशासकीय व स्वयंसेवी शासनमान्य सार्वजनिक ग्रंथलयास ग्रंथपुरवठा केल्याचा पुरावा जोडण्यात यावा.

सदर ई-बुक्स सूटदर खरेदीचे दरपत्रक/निविदा **दि.१९ जुलै, २०२४** पर्यंत प्राप्त होतील अशा बेताने **ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई-४०० ००१** यांचेकडे समक्ष वा पोस्टाने पाकीटावर " **ई-बुक्स खरेदीवरील सुटदर २०२४-२५ दरपत्रक/निविदा**" अशी नोंद करुन पाठवावी. या तारखेनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रक/ निविदा विचारात घेतल्या जाणार नाही.

विहित मुदतीत प्राप्त दरपत्रक/निविदा **दि. २३ जुलै, २०२४** रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील. संबंधितांनी स्वखर्चाने ग्रंथालय संचालनालय, नगर भवन, मुंबई येथे उपस्थित रहावे. मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रक/ निविदापैकी वरील ई-बुक्सच्या किंमतीवर तुलनात्मक दृष्टया संख्यानिहाय जो जास्तीत जास्त सूटदर असेल तो विचारपूर्वक चर्चेतून, वस्तूनिष्ठ निश्चित केला जाईल. निश्चित करण्यात आलेले सूटदर ग्रंथालय संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय ग्रंथालयांना कळविण्यात येतील. तसेच संचालनालयाच्या **www.dol.maharashtra.gov.in,** उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या **htedu.maharashtra.gov.in** व शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द (upload) करण्यात येतील.

**संचालनालयास प्राप्त झालेल्या दरपत्रक/निविदाच्या आधारे ई-बुक्सखरेदीसाठी ई-बुक्स विक्रेत्यांची किंवा ई-बुक्स वितरकांची किंवा प्रकाशन संस्थांची निवड करण्यात येणार नसून संख्या निहाय ई-बुक्सखरेदी सूटदर निश्चित करण्यात येणार आहे, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच दरपत्रक/निविदा स्विकारणे वा कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर नाकारणे हे सर्व अधिकार ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय यांनी राखून ठेवले आहेत.**

सन २०२४-२५ या वर्षाकरिता मान्य /निश्चित झालेले सूटदरानुसार कोणीही पुरवठादार शासकीय ग्रंथालयांना **ई-बुक्स** (e-books) पुरवठा करु शकतील.

२५।०७।२४

**(अशोक मा. गाडेकर)**
**प्र.ग्रंथालय संचालक**